दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार ११ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३३० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये







# राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना शिंदे सरकारकडून मोठं गिफ्ट, पगारातील महागाई भत्त्यात वाढ

## ४६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ

**वादळवार्ता/विशेष**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्य सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना खूश केलं आहे. शिंदे सरकारने राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ केली आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या आधी राज्य सरकारकडून सरकारी कर्मचाऱ्यांना खूश करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्य सरकारने खूश करण्यासारखा निर्णयच घेतला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. महाराष्ट्र सरकारने राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना मोठं गिफ्ट दिलं आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. ही वाढ १ जानेवारी २०२४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार आहे. राज्य सरकारने नुकतंच ऊर्जा विभागातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या भत्त्यात वाढ केली होती. त्यानंतर आता राज्य शासनातील सर्व सरकारी कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्त्यात ४६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य सरकारमधील शासकीय कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य सरकारचं याबाबतचा आदेश काढला आहे.

असा आहे राज्य सरकारचा आदेश

१) शासकीय कर्मचारी आणि इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी, २०२४ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४६% वरुन ५०% करण्यात यावा.

२)सदर महागाई भत्ता वाढ दिनांक १ जानेवारी, २०२४ ते दिनांक ३० जून, २०२४ या कालावधीतील थकबाकीसह माहे जुलै, २०२४ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी.

३) भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

४ होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०७१०१०५२२८९५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

या आदेशामुळे राज्य कर्मचाऱ्यानंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे .



## कर्मचाऱ्यांनी अर्जित रजा टाकून शांतता रॅलीस उपस्थित रहावे-श्रीकांत बागलाने

बीड-सध्या मराठवाड्यात मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या ओबीसीतु मराठा आरक्षण मिळावे व सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी शांतता रॅली सुरु आहे. दिनांक 11 जुलै रोजी बीड येथे रॅलीचे आयोजन केले आहे. तरी मराठा समाजातील कर्मचारी अधिकारी बांधवांनी 1 दिवस समाजासाठी या उक्तीप्रमाणे 1 दिवसाची अर्जित रजा टाकून सुट्टी घ्यावी व रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन संभाजी ब्रिगेड शिक्षकवकर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत बागलाने, मनोज कवडे, उमेश पवार,गणेश शिंदे, परमेश्वर जाधव, अजित मुळक,सचिन कदम,भिवराज कोकणे, लिंगस्कर आदींनी केले आहे.

## बीड ते मुंबई पायी निघालेल्या शेख वसीम यांची भेट घेऊन आरक्षण समितीने जाहिर केला पाठिंबा

### समाजाने शेख वसीम यांना सहकार्य करावे - ॲड. प्रा. इलियास इनामदार

**बीड/प्रतिनिधि**

मुस्लिम आरक्षणाच्या मागणीसाठी बीड ते मुंबई मंत्रालय मागणीचे निवेदन देण्यासाठी दिनांक 4 जुलै पासून पायी प्रवासावर निघालेले येथील रहिवासी समाजसेवक शेख वसीम यांची आरक्षण समितीने औरंगाबाद वालुज येथे भेट घेऊन त्यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

असे की,राज्यात कित्येक वर्षापासून अनेक पक्ष संघटना नेत्यांच्या वतीने मुस्लिम आरक्षण आंदोलन केले जात आहे पण गेंड्याच्या कातड़ीचे सरकार या मागणीकड़े दुर्लक्ष करत आहे असेच एक आंदोलन बीड मधून शेख वसीम शेख सलीम यांच्या वतीने सुरु आहे त्यांनी मुस्लिम आरक्षण मागणीसाठी चक्क बीड ते मुंबई मंत्रालय पायी प्रवास सुरु केले आहे याची माहिती मुस्लिम आरक्षण समितीला मिळताच समितीने औरंगाबाद येथे जाऊन त्यांचे सत्कार करुन प्रोत्साहित केले व औरंगाबाद वाळूज ते पंढरपुर गांवापर्यंत त्यांच्या सोबत पायी चालत आरक्षण समितीचा पाठिंबा जाहिर केला व वाटेमध्ये कसलीही मदत लागली तर आरक्षण समिती आपल्या सोबत आहे असे आश्वासन



दिले समाजाने शेख वसीम यांना सहकार्य करावे प्रवासा त त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करावे असे आवाहन मुस्लिम आरक्षण संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष व राज्य संघटक ॲड. प्रा. इलियास इनामदार यांनी केले आहे. यावेळी त्यांच्यासोबत समाजसेवक शेख पाशा भाई,अफरोज अतार ॲड. सय्यद मिन्हाजोद्दीन,शेख इसमाइल, शेख अब्बास शेख हमीद आदींनी शेख वसीम यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करून प्रोत्साहन केले.

## शेतकऱ्यांच्या व गायराण धारकांच्या विविध मागण्यांसाठी वंचित आक्रमक. मागण्या तात्काळ मार्गी लावा अन्यथा तिव्र अंदोलन करु : पप्पु गायकवाड

**गेवराई/प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यात शेतकऱ्यांच्या व गायराण धारकांच्या विविध मागण्यांसाठी वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाली असून उपविभागीय अधिकारी बीड यांना गेवराई तहसिलदार मार्फत निवेदन दिले असून निवेदनाद्वारे केलेल्या मागण्या तात्काळ मार्गी लावा अन्यथा अनोख्या पद्धतीने तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांनी दिला. तालुक्यातील हजारो शेतकरी गोदाकाठच्या परिसरातील आहेत. यावर्षी पाऊस देखील वेळेवर झालेला आहे. पाऊस-पाणी चांगला झाला असल्याने पेरणी केलेली पिके डौलात आहेत. परंतु शेतकरी बांधवांना वेळेवर खत मिळत नाही, रासायनिक खतांचा जानिवपूर्वक कृत्रिम तुटवडा निर्माण करुन कृषीसेवा केंद्रधारक रासायनिक खतांची ओरिजिनल जिएसटीचे बिल देत नसून चढ्यादराने विक्री करत आहेत, कृषी अधिकारी कार्यालया मार्फत खताचे वाटप झाले नाही. गरीब अल्पभूधारक शेतकरी आज देखील रासायनिक खताच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना तात्काळ रासायनिक खताचे वाटप करण्यात यावे. तसेच कृषी कार्यालया मार्फत पोखरा योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होत नाही, ती व्यवस्थितपणे सुरळीत करण्यात यावी.

पोखरा योजने अंतर्गत खरेदी केलेल्या शेती औजारांचे दोन वर्षांपासून शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही ते अनुदान तात्काळ शेतकऱ्यांना वितरीत करण्यात यावे. गायराण जमीन धारकांना दिलेल्या नोटीस रद्द करून पेरलेल्या पिकांचे नुकसान करु नये, पेरलेले ते पिक त्या गायराण धारकाला घेवु द्यावे. तसेच तालुक्यातील पंधरा दिवसांपूर्वी चकलांबा येथे शेतात काम करत असतांना ३ शेतमजूर महिलांचा तर मालेगाव येथे शेतात गेलेल्या १७ वर्षीय युवकाचा विज पडून मृत्यु झाला होता त्या मृतांच्या कुटुंबाला तात्काळ अर्थीक मदत द्यावी व ज्यांचे पशुधन अवकाळी पावसाने व विज पडल्याने दगावली आहेत त्यांना तात्काळ अर्थीक मदत करावी.

शेतकऱ्यांना २०२० चा व दोन वर्षांपूर्वीचा विविध पिकांचा विमा आज पर्यंत मिळालेला नाही तो तात्काळ वाटप कराव तसेच पिक विम्याची खात्यात जमा झालेली रक्कम पिक कर्जात अनेक बँका वसूल करतात ती वसूल करू नये, तसेच सिविल स्कोरची अट न घालता पिक कर्ज वितरीत करण्याच्या सुचना गेवराई तालुक्यातील सर्व राष्ट्रीयीकृत व जिल्हा मध्यवर्ती बँकांना देण्यात याव्यात. राज्य सरकारने पीएम किसान सन्मान योजनेचे धर्तीवर नमो शेतकरी योजनेची घोषणा केली, मात्र अद्याप दोन हजार रुपये अनुदान शेतकऱ्यांना अद्याप मिळाले नाही ते लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात वितरीत करण्यात यावे, त्याचबरोबर पंचायत समिती मार्फत राबवली जाणारी मनरेगा योजणा गेवराई तालुक्यातील पूर्णपणे बंद आहे ती तात्काळ सुरु करण्यात यावी.



पावसाळ्याचे दिवस असताना शेतकऱ्याचा वेळ वाया चालला आहे, जसे की मोहगुणी लागवड, बांबू लागवड, शेवगा लागवड, गाय गोठा अशा विविध शेतकऱ्यांच्या मनरेगा योजना मार्फतच्या योजना बंद आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने शेतकरी बांधवांना अत्यंत मदतीची गरज असतांना कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन मिळत नाही तरी शासनाने तात्काळ मनरेगाच्या योजना सुरु कराव्यात. सर्व शेतकरी बांधवांच्या मागण्या तात्काळ मान्य करुन मार्गी लावाव्यात. अन्यथा शेतकऱ्यांच्या व गायराण धारकांच्या मागण्या मान्य न करुन त्या तात्काळ मार्गी लावल्या नाहीत तर वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने शेतकरी व गायराण धारकांना सोबत घेऊन पंधरा दिवसा नंतर गेवराई तहसिल कार्यालया समोर अनोख्या पद्धतीने तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा गेवराई तहसिलदार मार्फत उपविभागीय अधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी किशोर भोले, रेवन गायकवाड, ज्ञानेश्वर हवाले, किशोर चव्हाण, दस्तगीर शेख,अनिल बोराडे, सचिन कांडेकर,संदिप रोकडे, अनिल पंडित, कृष्णा खेडकर, आनिल साळवे, राहुल सोनवणे, सुदाम मोरे, कृष्णा हातागळे, विनोद थोरात, दिलीप सूर्यवंशी, बबन फुलझळके, बाबासाहेब गंगाधर,सुभाष बांगर, बबन जाधव, जयराम सदाफुले, आप्पासाहेब मस्के, अमोल मस्के, संतोष कसबे तसेच तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिलेटीनच्या कांड्याचा स्फोट झाल्याने पंधरा वर्षाचा मुलगा गंभीर जखमी

### बालकामगार कायद्यानुसार गुन्हा दाखल

केज/प्रतिनिधी तालुक्यातील जोला शिवारात एका विहीरीचे खोदकाम करत असताना जिलेटीनच्या काड्यांचा स्फोट झाल्याने एक पंधरा वर्षाचा एक मुलगा गंभीर झाला असुन जखमी मुलाच्या आईच्या फिर्यादीवरुन केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

केज तालुक्यातील जोला शिवारात एका विहीरीमध्ये ट्रॅक्टरच्या साह्याने होल मारण्याचे काम ९ एप्रिल२०२४ रोजी दुपारी बारा वाजणेच्या सुमारास सुरु असताना आनंद विकास हलकडे व अनिल निंबाळे हे सदर होलमध्ये जिलेटीन भरल्यानंतर त्यावर वाळु टाकत असतांना गोकुळ शेषेराव ढाकणे,शेषेराव ढाकणे व शिवाजी ठोंबरे यांच्या निष्काळजीपणामुळे अचानक स्फोट झाल्याने माझा मुलगा आनंद विकास हलकडे वय १५ वर्षे हा गंभीर जखमी झाला असुन त्यामध्ये त्यास एका डोळ्याने दिसत नसुन दुसऱ्या डोळ्यानेपण थोडेच दिसत आहे. त्याचा डावा हात कोपरात आखडुन गेला असुन उजव्या हाताच्या अंगठा तुटलेला असुन पोटावर,तोंडावर व हातावर छातीवर गंभीर जखमा झाल्या आहेत. म्हणुन माझी गोकुळ शेषेराव ढाकणे,शेषेराव ढाकणे दोन्ही रा.सारूळ ता केज शिवाजी ठोंबरे रा दहिफळवड. ता केज जि बीड यांचेविरुध्द केज पोलीस ठाण्यात गु.र.नं ३८६/२०२४ बालकामगार कायद्यानुसा गुन्हा नोंद झाला असुन पुढील तपास फौजदर आनंद शिंदे हे करत आहेत.

आपले राष्ट्र जर कायद्याने सजग झाले तर कायदा पाळणारांची संख्या वाढेल व गुन्हेगारांचे प्रमाण कमी होईल. हाच उद्देश घेऊन विधी सेवा प्राधिकरण कार्य करीत आहे. कोणत्याही बालकाला अडचणीच्या वेळी मदत हवी असेल तर मुलांनी १०९८ यां क्रमांकावर फोन करून कळवावे असे आवाहन विधीदूत तत्वशील कांबळे यांनी केले.

सदरील कार्यक्रमास विधीदूत मिथून जोगदंड, तसेच सेंट ॲन्स स्कूल मधील शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत परळी तालुक्यातील बेलंब्यात लाखो रुपयांचा अपहार; विहीर न खोदता उचलले पैसे

## परळी पंचायत समितीतील भ्रष्ट अधिकारी कर्मचारी व रोजगार सेवक यांना निलंबित करण्याचे प्रशासनाचे आदेश-ज्ञानेश्वर गित्ते

परळी /प्रतिनिधी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत बेलंबा येथे विहीर न खोदता विहिरीसाठी असलेले मस्टर स्वरूपातील 1 लाख 12 हजार दोनशे तीन रुपये मजुरांच्या नावे रोजगार हमी कायदा व शासन निर्णय डावलुन देण्यात आले होते. शासन निधीचा दुरुपयोग करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी परळी पंचायत समितीतील तांत्रिक अधिकारी ए ए पोलशेटवार, ऑपरेटर एस एस पिटलेवाड, ग्रामरोजगार सेवक सुरेश बलभीम गित्ते यांना शासकीय सेवेतून निलंबित करावे असा आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दि. ९ जुलै २०२४ रोजी पारित केला असल्याची माहिती तक्रारदार वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर जीवन गित्ते यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान सदरील प्रकरणामुळे परळी तालुक्यात एकच खळबळ उडाली असून अनेक गावातील न खोदता पैसे उचललेल्या सिंचन विहिरींची प्रकरणे या निमित्ताने बाहेर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेअंतर्गत बेलंबा येथील पांडुरंग खंडू सरवदे यांना सिंचन विहिर मंजूर करण्यात आली होती. सदरील विहीर न खोदता विहिरीसाठी असलेले मस्टर पूर्ण करून रोजगार हमी कायद्याची पायमल्ली करण्यात आली. शासन निधीचा दुरुपयोग करून शासनाची फसवणूक करणारे परळी पंचायत समिती मधील तांत्रिक अधिकारी पोलशेटवार ए. ए.पंचायत समिती परळी ऑपरेटर पिटलेवाड व बेलंबा येथील ग्रामरोजगार सेवक सुरेश बलभीम गित्ते यांनी शासन नियमबाह्य कामकाज करून पांडुरंग खंडू सरवदे रा. बेलंबा यांना विहीर न खोदता सदरील विहिरीसाठी १ लाख १२ हजार २०३ रुपये मजुरांच्या नावे रोजगार हमी कायदा व शासन निर्णय डावलून देण्यात आले. तशी तक्रार वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर जीवन गित्ते यांनी परळी पंचायत समिती गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली होती. सदरील निवेदनाची दखल घेऊन तत्कालीन विस्तार अधिकारी यांनी दि. 8 फेब्रुवारी 2024 रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन चौकशी केली असता शेतामध्ये विहिरीचे खोदकाम झालेले नाही असा अहवाल सादर केला होता. त्या अनुषंगाने संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासाही मागणीला होता. प्रशासकीय मान्यता दिलेली नसतानाही संबंधितांनी वर्क ऑर्डर जनरेट करणे, मागणी नसतानाही मस्टर काढणे, मोजमाप पुस्तिका व मस्टर नसतानाही पांडुरंग खंडू सरवदे यांची विहिरीचे काम न होताच मस्टर काढून शासकीय रक्कम १ लाख १२ हजार २०३ रुपयांचा अपहार केला होता. याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी शासन परिपत्रक दि. २५ ऑगस्ट २०२१ व दि ११ नोव्हेंबर २०२० मधील तरतुदीनुसार संबंधितांच्या सेवा आपल्या स्तरावर कमी करण्यात येऊन तसा अहवाल कार्यालयास सादर करावा असे पत्र गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना काढले आहे. सदरील पत्रकार परिषदेस वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर गित्ते, युवक आघाडी तालुकाध्यक्ष राजेश सरवदे, परळी शहराध्यक्ष गफारशहा खान, प्रसिध्दी प्रमुख बालासाहेब जगतकर,युवा ता. उपाध्यक्ष अवि मुंडे,संतोष वाव्हळे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.



## जिल्हा प्रशासनाच्या वतीने मुंगशी ता.माढा येथे श्री संत एकनाथ महाराज पालखीचे स्वागत...



सोलापूर/विश्वास चोपडे आषाढी वारी निमित्त पंढरपूर येथे पायी जाण्यासाठी श्री संत एकनाथ महाराज पालखी पैठण येथून दिनांक २८ जून २०२४ रोजी निघाले आहे हा पालखी सोहळा सोलापूर जिल्ह्याच्या मुंगशी ग्रामपंचायत च्या हद्दीत दिनांक १०जून २०२४ रोजी सकाळी पोचला यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी सौ प्रियंका आंबेकर मॅडम माननीय तहसीलदार विनोद रणवरे साहेब नायब तहसीलदार माढा विजय लोकरे साहेब मुंगशी गावचे सरपंच सौ.कमल सूर्यकांत महाडिक यांनी पालखीला पुष्पहार अर्पण करून पालखीचे सोलापूर जिल्ह्यात उत्साहात स्वागत केले. यावेळी उपस्थित गटविकास अधिकारी महेश मुळे, मंडल अधिकारी रोपळे बसवराज समदुले, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर संदीप देवकते, डॉक्टर बालाजी भोसले, विस्तार अधिकारी सुतार साहेब,साठे साहेब, शेंडगे साहेब,बनाते भाऊसाहेब, कव्हे गावचे तलाठी नलवडे,शाखा अभियंता वाघमारे साहेब, मा.आमदार नारायण आबा पाटील अकलूज ग्रामपंचायत सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील,जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब उबाळे, मा.पंचायत समिती सदस्य नानासाहेब पाटील, यांच्यासह विठ्ठल भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पानी फाऊंडेशन व सेट्रिज संस्थेअंतर्गत गट शेती करणाऱ्या गटांना मिळणार वृक्ष लागवडीसाठी मोफत फळांची रोपे.

**किल्लेधारुर/प्रतिनिधी**

सत्यमेव जयते फार्मर कप मध्ये सहभागी गटातील शेतक-यांना पाणी फाउंडेशन व सेट्रिज संस्थे अंतर्गत मोफत वृक्ष देण्याचा व यांची जोपासणा करण्याचा संकल्प या गटांना करायाचा असुन फळ बाग शेती वाढावी या प्रमुख हेतूने हा उपक्रम राबवण्यात येत असून जास्तीजास्त शेतक-यांनी या फळबाग लागवड योजनेत सहभागी व्हावे साठी तालूका निहाय प्रशिक्षण घेतले आहे असे माहिती पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक संतोष शिनगारे यांनी दिली आहे.

सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेअंतर्गत आयोजित गट शेती द्वारे आपले उत्पन्न वाढवणाऱ्या व खर्च कमी करणाऱ्या गटांना चालना देण्यासाठी विविध फळांची रोपे मोफत दिली जाणार आहेत यामध्ये आंबा, चिकू, मोसंबी, संत्रा, लिंबू, सिताफळ, जांभूळ, पेरू इत्यादी फळाच्या रोपांचा समावेश करण्यात आलेला आहे.बांधावर लागवड करायची असेल तर मोहगणी व सागाची रोपे ही मोफत दिली जाणार आहेत.गटशेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त फळपिकाची लागवड करून पारंपारिक पीक पद्धतीला फाटा देऊन पैसा देणारी फळ पिकांची लागवड करावी अशी विनंती पानी फाउंडेशनचे विभागीय समनव्यक संतोष शिनगारे यांनी केली.पहिल्या टप्प्यातील प्रयोगासाठी बीड जिल्यातील बीड, केज, धारूर, अंबाजोगाई, आष्टी, संभाजीनगर जिल्यातील वैजापूर, खुलताबाद, फुलंब्री व बुलडाणा जिल्यातील मोताळा तालुक्यातील पानी फाऊंडेशनच्या फार्मर कप स्पर्धेत सहभागी शेतकरी गटांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. एकत्रित फळबाग लागवड करण्यासाठी या गटांना एक दिवसीय ट्रेनिंगही देण्यात आलेले आहे. यामध्ये २२०० शेतकऱ्यांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शेतकऱ्यांनी खडे खोदायला सुरुवात केली असून लवकरच रोपे लागवड करण्यात येणार आहेत.रोपासाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन शेतकऱ्यांनी करणे गरजेचे आहे. रोपाचा खडा कसा खोदावा, खडा कसा भरावा, रोप कसे लागवड करावे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. लवकरच फळपिकावर आधारित विद्यापीठाच्या शास्त्रज्ञाच्या मदतीने ऑनलाईन डिजिटल शेतीशाळा ही सुरु करण्यात येणार आहे. यावर्षी पानी फाऊंडेशन व सेट्रिज संस्थेमार्फत एक लाख रोपे लागवड करून ते जगवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शेतकऱ्यांना समृद्ध व आर्थिक दृष्टीने सक्षम करणायचा हा एक छोटासा प्रयत्न सुरु आहे. यामध्ये मोलाची मदत व मार्गदर्शन सेट्रिज संस्थेचे भेटणार आहे. सेट्रिज च्या साह्याने पानी फाऊंडेशन काम करत असलेल्या ११ ठिकाणी मेवाकी पद्धतीने रोपाची लागवड करून ती सर्व व्यवस्थित जगवन्यात यश आले आहे. याचाच पुढचा टप्पा म्हूणन शेतकऱ्यांना आर्थिक संप्पन्न बनवण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले आहेत.वरील तालुक्यातील पानी फाऊंडेशनच्या तालुका टीम सोबत चर्चा करून आपल्या गटाचे नियोजन करावे असे आवाहन पानी फाऊंडेशन चे प्रमुख मार्गदर्शक डॉ.अविनाश पोळ, सीईओ सत्यजित भटकळ यांनी केले आहे.

# बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याची जनजागृती

**परळी /प्रतिनिधी**

आज दिनांक १० जुलै २०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत न्या.आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ”बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२“ या विषयी सेंट अॅन्स स्कूल, जालना रोड, बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी न्या. जी.जी . सोनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अशोक तांगडे ,तत्त्वशील कांबळे ,शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर रोशमीन , मिथुन जोगदंड आदी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात बालकांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा २०१२ या विषयावर बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या .जी. जी. सोनी यांनी उपस्थीत विद्यार्थ्यांना या कायदयाविषयी माहिती सांगितली बालकांनी आपल्यासोबत अथवा आपल्या मित्र मैत्रिणींसोबत अशी घटना घडल्यास अशा प्रसंगी घाबरून किंवा गोंधळून न जाता आपल्या विश्वासातील व्यक्तीला, पालकांना, शिक्षकांना सांगावे व अशा घटनांपासून सावध रहावे असे मार्गदर्शनपर बोलताना सांगितले. या कार्यक्रमाची प्रस्थावना सेंट अॅन्स स्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर रोस्मीन यांनी केली व या कार्यक्रमाचे महत्व विद्यार्थ्यांना विषद केले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष बालकल्याण समिती, बीड अशोक तांगडे यांनी गूड टच आणि बॅड टच यासंबंधीत माहिती बालकांना समजेल अशा सोप्या भाषेत सांगितली जसे की, आई, वडील ,आजी, आजोबा, बहिण,



भाऊ, डॉक्टर ,शिक्षक यांनी काळजीपोटी केलेला टच गूड टच असतो. तर जो स्पर्श तुम्हाला आवडत नाही. ज्या स्पर्शामुळे तुम्ही घाबरून जाता, गोंधळून जाता, तुम्हाला वाईट वाटते असा प्रत्येक स्पर्श हा बॅड टच असतो. कधी कधी खूप जवळचा व्यक्ती सुध्दा असा बॅड टच करू शकतो. असा टच झाल्याबरोबर बालकाने त्या व्यक्तीपासून दूर जावे व घडलेली बॅड टचची घटना आई वडिल शिक्षक किंवा विश्वासातील जवळच्या माणसाला सांगावी, असे अवाहन बालकल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना तत्वशील कांबळे म्हणाले की बालविवाह बालमजुरी ,बाल लैंगिक शोषण,भिक्षा मागणारी बालके अशा सर्व समस्येची बालके आपल्याला आढळतात या सर्व बालकांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी व कायद्याचे सजग नागिरक निर्माण करण्याचे कार्य विधी सेवा प्राधीकरणाच्या वतीने केले जाते. आपले राष्ट्र जर कायद्याने सजग झाले तर कायदा पाळणारांची संख्या वाढेल व गुन्हेगारांचे प्रमाण कमी होईल. हाच उद्देश घेऊन विधी सेवा प्राधिकरण कार्य करीत आहे. कोणत्याही बालकाला अडचणीच्या वेळी मदत हवी असेल तर मुलांनी १०९८ यां क्रमांकावर फोन करून कळवावे असे आवाहन विधीदूत तत्वशील कांबळे यांनी केले.

सदरील कार्यक्रमास विधीदूत मिथून जोगदंड, तसेच सेंट अॅन्स स्कूल मधील शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# धारूर वकिल संघाचे अध्यक्ष पदी अॅड एम. एस.अंहकारे यांची निवड.

**किल्लेधारुर/प्रतिनिधी**

धारूर येथील वकिल संघाची निवडणूक प्रक्रीया रितसीर कार्यक्रमानुसार संपन्न होऊन अध्यक्ष पदी अॅड एम. एस. अंहकारे यांची निवड करण्यात आली ,उपाध्यक्ष सचिव आदी पदाची निवड करण्यात आली , निवडीनंतर नवनियूक्त पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

दर वर्षी प्रमाणेच याही वर्षी वकिल संघ धारूर येथे वकील संघाची निवडणूक पार पडली.त्यामध्ये अध्यक्ष म्हणून अॅड एम. एस.अहंकारे , उपाध्यक्ष म्हणून अॅड प्रशांत ठोंबरे, सचिव म्हणून अॅड आर.व्ही. आवस्थी ,कोषाध्यक्ष म्हणून अॅड रवि एस सावंत तर ग्रंथपाल म्हणून अॅड बळवंत नखाते यांची निवड झाली. मतदान हे लोकशाही पध्दतीने पार पडले. निवडणूक अधिकारी म्हणून अॅड कुंदनकुमार शुक्ला यांनी चोखपणे कामगिरी पार पाडली त्यावेळी निवडून आलेल्य सर्व विजयी उमेदवारांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व वकिल उपस्थित होते.

# अंबाजोगाईत गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

**अंबाजोगाई/परवेज पटेल**

शहरातील कुत्तरविहीर परिसरात वास्तव्यास असणाऱ्या युवकाने राहत्या घरात आत्महत्या केल्याची घटना दिनांक ९ जुलै रोजी सायंकाळी ८:३० वाजायच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अतुल निकम (वय २४) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. या बाबत प्राप्त माहिती अशी की, शहरातील कुत्तरविहीर परिसरात अतुल निकम हा युवक आईवडिलांसोबत राहत होता. तो उपजीविकेसाठी लाईट फिटींगचे काम करीत होता. मंगळवारी सायंकाळी त्याने घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. अतुल याने हे टोकाचे पाऊल का उचलले ? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. दरम्यान, अंबाजोगाई शहर पोलीसांनी घटनेचा पंचनामा केला असून ते अधिक तपास करीत आहेत.

# अवाजवी घरपट्टी वाढीतून नाशिककरांना मिळणार दिलासा

नाशिक/सुरेश इंगळे

तत्कालीन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी नाशिककरांना लावलेल्या आवाजवी घरपट्टी मधून नाशिककरांना आता दिलासा मिळणार आहे .शिवसेना शिंदे गटा पाठोपाठ भाजप आमदार यययदेवयानी फरांदे यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लक्ष वेधले. नंतर नगर विकास विभागाने महापालिका आयुक्तांना घरपट्टीचे पूर्ण निरीक्षण करून न्यायचित फेरबदलाचे आदेश दिले आहेत.



मुंडे यांनी १ एप्रिल २०१८ पासून शहरातील मिळकतीसह मोकळ्या भूखंडावर पाच ते सहा पट करवाड करत, नाशिक करांवर घरपट्टी वाढ लादली होती .कर सुधारणेखाली शहरातील इंच इंच जमिनीवर घरपट्टी लादण्याचा इतकेच नव्हे तर शेती क्षेत्रालाही घरपट्टी आकारणीचा अजब गजब निर्णय मुंडे यांनी घेतला होता. या आवाजवी करवाढी विरोधात जन आंदोलन उभे राहिले होते. एवढेच नव्हे तर त्या विरोधात नाशिककरांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे .दरम्यान काही महिन्यापूर्वी शिवसेनेच्या शिंदे गटाने या प्रकरणावर आवाज उठविल्या नंतर आवाजवी घरपट्टी वाढीचे निरीक्षण करण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले होते. परंतु दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणूक आणि त्या पाठोपाठ विधानसभेच्या आणि शिक्षक मतदार संघ निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने निर्णय होऊ शकला नव्हता. आता आमदार फरांदे यांनी या प्रश्नाकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले असून सदर करवाढ रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे. नगर विकास विभाग मुख्यमंत्र्यांच्या अधिनस्त असल्याने या विभागाने महापालिका आयुक्तांना घरपट्टीचे पुनर्निरीक्षण करून न्यायचीत फेरबदल करण्याचे आदेश दिले आहेत .त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# लोहा कंधारमधून शिवसेनेची मशाल पेटवणारच -एकनाथ पवार



**नांदेड प्रतिनिधी :** नांदेड : मातोश्री येथे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांची महाराष्ट्र राज्य संघटक एकनाथ पवार व शिष्टमंडळाने सदिच्छा भेट घेतली.यावेळी आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनेबाबत चर्चा करत लोहा कंधारमधून मशाल पेटवणार असा संकल्प यावेळी एकनाथ पवार यांनी केला.आजची ही भेट आम्हा शिवसैनिकांसाठी एक बळ देणारी असून उद्धवजींना भेटून नेहमी प्रेरणा मिळते असे उद्गारही यावेळी पवार यांनी काढले. याप्रसंगी संपर्क प्रमुख बबनराव थोरात सहसंपर्कप्रमुख मुक्तेश्वर धोंडगे, विधानसभा प्रमुख भाऊसाहेब पाटील कदम कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक साहेबराव काळे तालुकाप्रमुख चंद्रकांत पाटील आडगावकर, विक्रम कदम विधानसभा समन्वयक सुरेश हिलाल, माजी जिल्हा परिषद सदस्य बालू भैय्या परदेशी, कंधार तालुका प्रमुख सचिन पेठकर, लोहा तालुकाप्रमुख संजय ढाले, शहर प्रमुख खंडू पाटील पवार, योगेश नंदनवनकर, संतोष पाटील गवते, डि.बी. इंगोले, रुद्रा भोस्कर, आनंदा पाटील पवार आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# चिश्तीया महाविद्यालयात वृक्षारोपण मोहिमे सपन्न

**खुलताबाद/प्रतिनिधी**

दि.९ महाराष्ट्र शासन व्दारे वनमहोत्सव ऊपक्रम अंतर्गत चिश्तीया महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण मोहिम अंतर्गत संस्थाध्यक्ष मोहम्मद आयुब यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.यावेळेस प्राचार्य डॉ.सय्यदा अर्शिया कादरी व मोहम्मद सलीम ( ईन्शा हार्डवेअर)सामाजिक कार्यकर्ते, त्याचबरोबर अब्दुल कादर माजी महानगरपालिका



अधिकारी यांच्याही हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभाग तर्फे गांव पातळीवर, सार्वजनिक ठिकाणी व दत्तक गांव येथे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. यावेळेस कार्यक्रमाधिकारी डॉ. मुजाहेद ऊर रहेमान व डॉ. शिल्पा देशपांडे डॉ. पुरुषोत्तम रामटेके,डॉ.सिद्दीकी अफरोजा,डॉ.नाझनीन सुलताना, शेख जाकीर , व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक ऊपस्थित होते.

# म.न.से.ने केले जागरण गोंधळ आंदोलन

## कार्यकारी अभियंता सगर व राजकमल कंट्रक्शनची चौकशीची मागणी

**बीड/प्रतिनिधी**

बीड कार्यकारी अभियंता सगर यांनी राजकमल कंट्रक्शन ला हाताशी धरून महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणा यांच्या मार्फत बीड जिल्ह्यात झालेल्या कामात बोगसगिरी केली आहे. या कामाची चौकशी करून राजकमल कंट्रक्शनला काळे यादीत टाकण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण



विकास यंत्रणा कार्यालय समोर जागरण गोंधळ आंदोलन केले. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या नावाखाली बोगस कामे झाल्याची याची तक्रार कार्यकारी अभियंता सगर यांच्याकडे चौकशीची मागणी केली होती. तक्रारीची दखल न घेतल्यामुळे आज कार्यालय समोरच मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे,सहकार सेना अध्यक्ष अशोक सुरवसे, शहराध्यक्ष करण लोंढे, जिल्हा सचिव सोमेश कदम, जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे, अनिता घुले यांच्यासह मनसेचे कार्यकर्ते या जागरण गोंधळ आंदोलनात उपस्थित होते.

# लै झाली परळीकरांची बेजारी हक्काचे घर वाचवण्यासाठी आता मनसे आपल्या दारी

## १० जुलैपासून मनसेतर्फे परळी वैजनाथमध्ये रेल्वे प्रकल्प ग्रस्तांसाठी एक सही संतापाची मोहीम : वैजनाथ कळसकर

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**
सध्या आपल्या येथील रेल्वेचे दुपदरीकरण करण्यासाठी युद्धपातळीवर सरकार हालचाली करत आहे. यात हजारो नागरिकांचे भविष्य पणाला लागले आहे. पिढ्यानपिढ्या लोकांनी आयुष्य वेचून आपले रक्त आणि घाम गाळून मेहनतीने उभे केलेले घरे दारे सरकारी बुलडोझर खाली जाण्याची भीती निर्माण झाल्याने नागरिक हैराण झाले आहेत. विकासाला मनसेचा विरोध नाही पण त्यासाठी हजारो लोकांच्या घरावर सरकारी वरवंटा फिरणेही योग्य बाब नाही. त्यामुळे परळी वैजनाथ येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आता इतर कोण्या पक्षांप्रमाणे कोणतेही बोलबच्चन न देता प्रत्यक्ष कृती करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने १० जुलैपासून मनसेतर्फे परळी वैजनाथमध्ये रेल्वे प्रकल्प ग्रस्तांसाठी एक सही संतापाची मोहीम राबविण्याचे ठरवले आहे. प्रकल्प ग्रस्तांना कोण्या राजकारणी लोकांचे उंबरठे झिजवण्याची गरज नाही कारण आता 'लै झाली परळीकरांची बेजारी हक्काचे घर वाचवण्यासाठी आता मनसे आपल्या दारी' येत आहे. आम्ही तुमच्या वेदना समजून एक पाऊल पुढे टाकत आहोत, तुम्ही आम्हांला सकारात्मक प्रतिसाद द्याल याचा विश्वास आहे असे प्रतिपादन मनसेचे शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



सत्ताधारी स्वतःची पोळी भाजण्यासाठी वाट्टेल ते आश्वासने देतील पण नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतील घडामोडी बघता निकाल लागल्यावर मोजून १५ दिवसांत केंद्र सरकारचे गॅझेट निघाले याचा विचार करता सुज्ञ जनता या घटनाक्रमागे कोण आहे ह्याचा अंदाज लावू शकते. त्यामुळे आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात आपणा सर्वांच्या सह्यानिशी आपले गाऱ्हाणे रेल्वे बोर्डसह, केंद्र सरकारकडे मांडू अशी भूमिका मनसेतर्फे जि.उपाध्यक्ष दत्तात्रय दहीवाळ, ता.अध्यक्ष श्रीकांत पाथरकर, शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर,ता. उपाध्यक्ष विठ्ठलराव झिल्मेवाड, शहरउपाध्यक्ष प्रशांत कामाळे,महेश शिवगण,ऋषिकेश बारगजे,हानुमान सातपुते,माणिक लटींगे,शाखाध्यक्ष धनराज आवाड आदींनी घेतली आहे.

सर्व्हे नंबर ७५ चा वाली कोण? सर्व्हे नंबर ७५ हा भाग भारत सरकारने १९ जून २०२४ रोजी काढलेल्या गॅझेटमध्ये नगर परिषदेचा आरक्षित भाग दाखविला आहे. त्यामुळे हा प्रकल्प जर प्रत्यक्षात साकार झाला तर या सर्व्हे नंबर मधील मिलिंद नगर, इंदीरा नगर, बरकत नगर आदी भागात राहणाऱ्या हजारो लोकांच्या पुनर्वसन कसे होणार यावर कोणीच बोलायला तयार नाही.कारण, सरकार दरबारी या भागाची नगर पालिकेचे आरक्षण असल्याची नोंद असल्याने येथील स्थायिकांना ना कोणाला आर्थिक मोबदला मिळणार, ना कोणाला नवीन जागेत स्थलांतरित केले जाणार, तसेच कोणाला रेल्वे नौकरी देखील दिली जाणार नाही. त्यामुळे सर्व्हे नंबर ७५ चा वाली कोण? असा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## बीड येथे आयोजीत शांतता रॅलीसाठी धारुर मध्ये ऑटो रिक्षा युनीयनची जनजागृती फेरी

**किल्ले धारूर/ प्रतिनिधी**
मराठा आरक्षणासाठी बीड येथे दि.११ जुलै रोजी आयोजीत शांतता रॅलीसाठी धारुर मध्ये ऑटो रिक्षा युनीयनच्या वतीने जनजागृती फेरी काढण्यात आली, याला उस्फुर्त प्रतीसाद मिळाला.मोठ्या संख्येने शांतता रॅलीसाठी जाण्याचा निर्धार करण्यात आला.



सकल मराठा समाज बांधवाचे वतीने दि.११ जुलै रोजी बीड येथे मनोज जंरागे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शांतता रॅली काढण्यात येणार आहे, या साठी धारूर शहरातील ऑटोरिक्षा युनीयनचे वतीने मुख्य रस्त्यावर व शहरात जनजागृती फेरी अध्यक्ष शाहूराव चव्हाण व उपाध्यक्ष सुरेश शेळके यांच्या नेतृत्वा खाली काढण्यात आली .

## पैठण तालुक्यातील रांजणगाव खुरी परिसरात खरिपाची दुबार पेरणी सुरु पावसाने दडी मारण्याचा परिणाम : शेतकरी चिंतेत

पैठण/चैताली औटे गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे पैठण तालुक्यातील रांजणगाव खुरीसह परिसरात शेतकऱ्यांची खरिपाच्या दुबार पेरणी व लागवडीला सुरुवात केली आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. जूनमध्ये मृगनक्षत्रात जोरदार पाऊस झाल्यामुळे रांजणगाव खुरी, बल्लाळपूर, रांजणी, इमामपूर, गाडेगाव, गंगापूर, म्हारोळा, शेकटा, तोंडोळी, लोहगाव, आलियाबाद, गिधाडा, मुलानी वाडगाव, ढाकेफळ, गाडेगाव पैठण परिसरातील शेतकऱ्यांनी कपाशी, मका, तूर, सोयाबीनचे बियाणे खरेदी करून लागवड केली. काही दिवसांनंतर याखरीप पिकांची उगवण झाली. अनेक शेतकऱ्यांनी कोळपणी केली,खत दिले.परंतु गेल्या काही दिवसांपासून पावासाने दडी मारल्यामुळे पीक कोमेजली आहे, ही पीक जळून जात असून रांजणगाव खुरी परिसरात दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर कोसळले आहे.यामुळे अनेक ठिकाणी शेतकरी दुसऱ्यांदा बियाणांची खरेदी करून दुबार पेरणी करताना दिसून येत आहे.

## पाचोड येथील स्थानकात महिला बसवाहकाला मारहाण बसमध्ये न घेतल्याचा प्रवाशाला राग : आरोपीवर गुन्हा दाखल

पैठण/चैताली औटे बसमध्ये न घेतल्याच्या कारणावरून एका प्रवाशाने शिवीगाळ करत महिला वाहकाच्या शर्टच्या कॉलरला पकडून खाली ओढत मारहाण केली. त्यानंतर बस पेटवून देण्याची धमकी देत आरोपी घटनास्थळावरून फरार झाला आहे. ही घटना मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास येथील बसस्थानकात घडली. दरम्यान, याप्रकरणी आरोपीविरोधात सायंकाळी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल डुकळे (रा. पाचोड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार आंबाजोगाई ते छत्रपती संभाजीनगर बस (एमएच २० बीएल २८०४) मंगळवारी पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास निघाली होती. ही बस सकाळी सव्वा नऊ वाजेच्या सुमारास पाचोड येथील बसस्थानकात आली होती. येथून छत्रपती संभाजीनगरकडे निघाल्यानंतर डुकळे याने पाचोड येथे बसमध्ये महिला वाहकाला प्रवासी थांबविण्यासाठी चालकाला हात दिला. त्यानंतर बस थांबली. परंतु, बसमध्ये गर्दी आहे, तुम्ही दुसऱ्या बसने या, असे वाहक सविता आदिनाथ तोंडे (वय ३४) यांनी डुकळे यांना सांगितले. परंतु, आरोपी डुकळे याने तोंडे यांचे काही एक न ऐकता उलट त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर महिला वाहकाच्या शर्टच्या कॉलरला पकडून बसखाली ओढन मारहाण केली. बस पेटवून देण्याची धमकी देत आरोपीने घटनास्थळावरून धूम ठोकली. दरम्यान, याप्रकरणी वाहक तोंडे यांनी पाचोड पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी सायंकाळी पाच वाजता आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक शरदचंद्र रोडगे करत आहेत.

## महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग संघर्ष समितीच्या वतीने लाक्षणिक उपोषण.

उरण/विठ्ठल ममताबादे महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग संघर्ष समितीच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालय कोकण भवन व नगरपालिका प्रशासन संचालनालय कार्यालय येथे लाक्षणिक उपोषण आंदोलन करण्यात आले.नगरपरिषद नगरपंचायत मधील कामगारांच्या प्रलंबित मागण्यांकडे ज्या मागण्यांपैकी मुख्य मागण्या मा. मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या समवेत राज्याचे मुख्य सचिव, वीत्त विभाग सचिव, सामाजिक न्याय विभागाचे सचिव आणि नगरविकास विभागाचे सचिव यांच्या उपस्थितीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीमध्ये झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी १ वर्षे आणि ३ महिने होऊनही झालेली नाही याकडे प्रामुख्याने लक्ष वेधणेकरिता कोकण भवन विभागीय आयुक्त




कार्यालयावर व नगरपालिका प्रशासनालय कार्यालय येथे नगरपरिषद आणि नगरपंचायत संवर्ग संघर्ष समितीचे निमंत्रक व म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष अँड सुरेश ठाकूर, संघर्ष समितीचे नेते व म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे कार्याध्यक्ष संतोष पवार, संघर्ष समितीचे नेते व म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव याच्या नेतृत्वाखाली करण्यात आले व त्यानंतरच झालेल्या सभेत पुढिल आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली.तसेच येत्या २० जुलै २०२४ रोजी पनवेल महानगर पालिकेतील कामगारासह कोकण विभागीय भव्य मेळावा पनवेल येथे घेण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली. या प्रसंगी कामगारांना मार्गदर्शन करण्यात आले. आंदोलनाप्रसंगी कोकणातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष, राकेश पाटिल, भूषण काबाडी, अजिंक्य हुलवणे, शैलश गायकवाड,अंनत पाटिल, दत्तगुरू म्हात्रे,रविंद्र आयनोडकर, सतोष कुडेकर, नरेद्र नांदगावकर, मनोज पुलेकर,आलिम मुल्ला, चव्हाण सचिन रसालकर , राहूल गायकवाड, हरेश जाधव मधुकर भोईर , रमेश कांबळे, सिताराम दादा म्हसकर,श्रीमती संगीता सोलंकी, दत्तात्रय डोहले , माधव सिद्धेश्वरे, राजेश सोलंकी, जितेंद्र पाडावे इत्यादी कोकण विभागातील नगरपरिषद नगरपंचायत कामगार नेते व प्रतिनिधी , भगिनी मोठया प्रमाणात सहभागी झाले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077